नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/१२/२०२५ (बुधवार )**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद जिल्हा वाहतूक शाखा,नागपूर ग्रामीण आणि कुही पोलीस यांची संयुक्त कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही :—** दिनांक २३/१२/२०२५ रोजी जिल्हा वाहतूक शाखेचे पथक पोलीस स्टेशन कुही हद्दीत पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. नमुद पथकाने सदर माहीती कुही पोलीसांना देत कुही पोलीसांसह सयुंक्तीक कारवाई करत मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौजा कुही फाटा, येथे नाकाबंदी केली असता संशयीत वाहन टिप्पर क्र. एम एच ४९ सी आर २१२२ मिळुन आला. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता **१) हेमरतन मोरेश्वर येसमकर, वय ३७ वर्ष, रा. बालाजी नगर, नागपुर अशी माहीती प्राप्त झाली.** आरोपी चालकाला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. टिप्पर मालकाचे नाव विचारले असता चालकाने **स्वत:च मालक** असल्याचे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्र. एम एच ४९ सी आर २१२२ किंमती ४०,००,०००/—रूपये व १० ब्रास रेती किंमती ५०,०००/—रूपये असा एकुण ४०,५०,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी आरोपीविरूध्द पोस्टे कुही येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल संहीता, सहकलम ४, २१ खान खनिज अधिनियम, सहकलम ०३ सार्वजनिक मालत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**




## पोलीस ठाणे देवलापार हद्दीतील मौजा मुरडा जंगल शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर गुन्हा नोंद उपविभागिय पोलीस अधिकारी रामटेक यांची कामगिरी

पोलीस स्टेशन देवलापार :— दिनांक २४/१२/२०२५ रोजी श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, मौजा मुरडा जंगल शिवार येथे मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच श्री रमेश बरकते यांनी देवलापार पोलीस स्टेशन आणि उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय, रामटेक येथील अधिकारी अंमलदाराच्या पथकासह नमुद ठिकाणी जावुन रेड केली असता नमुद ठिकाणी नाल्याच्या काठावर हातभट्टी लावलेली दिसली. **आरोपी नामे विनोद सुखदेव धुर्वे ,रा. मुरडा, ता.रामटेक** हा पोलीस पथकाला पाहुन पळुन गेला. पोलीसांनी सदर हातभट्टी नष्ट करून घटनास्थळावरून १) ३०० लिटर मोहाफुल सडवा रसायन किंमती १५,०००/—रू. २) ६० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ६,०००/— रू. ३) लोखंडी ड्रम ४) जळावु लाकडासह इतर साहित्य असा एकुण २५,३५०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. **आरोपीविरुद्ध कलम महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**







## अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २३/१२/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा गांगापुर, उमरेड येथे नाकाबंदी केली असता मोपेड ॲक्टीव्हा गाडी क्र एम. एच. ४० डी ए ००४० ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता विदेशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे मनिष यंशवत वाघमारे वय ३२ वर्ष, रा. राजोला, ता. उमरेड हा अवैधरीत्या दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १८०० मिली विदेशी दारू आणि मोपेड ॲक्टीव्हा गाडी क्र एम एच ४० डी ए ००४० असा एकुण किंमती ५२,१८०/— रुपयेचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

दिनांक २३/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू तसेच वाहन, मोहाफुल दारू असा एकुण ६९,८२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन उमरेड येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवनी येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ०१ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ०७ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत १६२० मिली देशी दारु, १८०० मिली विदेशी दारू, ३९ लीटर मोहाफुल दारू तसेच वाहन असा एकुण ६९,८२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्रं ४४ वर शाळकरी विदर्याथ्यांच्या सुरक्षेसाठी केलेल्या उपाययोजनाबाबत

दि.२०/१२/२०२५ रोजी राष्ट्रीय महामार्गावर बसची प्रतीक्षा, प्रवासी निवाऱ्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष, देवलापार मध्ये विदयार्थ्यांची सुरक्षा धोक्यात या शिर्षकाखाली बातमी प्रसिध्द झाली आहे. सदर प्रकरणाची सविस्तर माहिती अशी आहे की, मौजा देवलापार या गावातून राष्ट्रीय महामार्ग क्रं ४४ हा गेलेला असून रोडलगत स्वामी विवेकानंद शाळा आहे. शाळेतील मुलांना रस्ता ओलांडण्यासाठी लोखंडी पुल उभारण्यात आला असून मुले त्यावरून शाळेत ये जा करीत असतात.तसेच शाळेत आजुबाजुचा गावातील मुले त्यांचा सोयी नुसार स्कुल व्हॅन तसेच एस.टी. महामंडळाची बस ने येत असल्याने ते मुलांना थेट शाळेचा गेट जवळ उतरवत असतात. काही मुले तसेच प्रवासी हे जुने देवलापार पोलीस स्टेशनच्या जवळ जुना प्रवासी निवारा असलेल्या ठिकाणीच थांबून बसची वाट पाहत उभे राहतात. तरी शाळा सुरू होणे अगोदर तसेच शाळेला सुट्टी होण्याचा १ तास अगोदर दररोज पोलीस स्टेशन देवलापार येथील वाहतूक

अंमलदार शाळेजवळील रोडवर वाहनांचा वेग कमी होणेकामी व कोणतीही दुर्घटना होवु नये याकरिता बॅरीकेट्स लावून कर्तव्यावर हजर असतात.तसेच राष्ट्रीय महामार्ग विभाग यांनी जुन्या प्रवासी निवारापासून सुमारे ३०० मिटर अंतरावर प्रवाशांकरिता वनविभागाचे बाजूला (जबलपूर ते नागपूर जाणाऱ्या रोडवर तसेच ग्रामीण रूग्णालय देवलापार जवळ ) नागपूर ते जबलपूर जाणाऱ्या रोडवर दोन्ही बाजूला प्रवासी निवारा उभारलेला असून सदर प्रवासी निवाऱ्याचा कोणीही उपयोग करत नसल्याने व जुने देवलापार पो स्टे. व बेलदा रोड जवळ नॅशनल हायवे रोड लगत काही शाळकरी मुले व प्रवासी बस ची वाट पाहत असतात त्याबाबत प्रवासी निवाऱ्याचे समस्येबाबत राष्ट्रीय महामार्ग विभागाला पोलीस विभागातर्फे पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**